अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# बिगुल वाजला, विश्वास आणि आत्मविश्वास नाही

निवडणुकीच्या रणधुमाळीचे बिगुल तर वाजले आहेत. परंतु राजकीय डावपेचांमधल्या घडामोडींचा अंदाज काही वेगळीच गणिते सांगतो आहे. आतापर्यंत प्रसिध्द झालेल्या निवडणूक सर्वेक्षणांमध्ये कोणत्याच पक्षाला पूर्ण बहुमत मिळणार नसल्याचे नोंदले गेले आहे. याचा अर्थ लोकशाही कार्यपध्दतीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राजकीय पक्षांविषयी लोकांमध्ये विश्वास नसल्याचेच ते फार मोठे निदर्शक ठरते. लोकांमधल्या म्हणजेच मतदारांमधल्या या अविश्वासाला सध्याची राजकारण शैलीच कारणीभूत ठरते. त्यांनी आपल्या कर्मदरिद्रीपणामुळे स्वत:चे नुकसान करुन घेतले. निवडणुका आल्या की मतदारांची मनधरणी सुरू होते. आम्हीच कसे तुमचे तारणहार आहोत आणि तुम्ही आम्हालाच कशी मते दिली पाहिजेत. हे पटवून देण्यासाठी सगळ्या राजकीय नेत्यांची उठापटक सुरू आहे. मग राहुल गांधींचे 'रोड शो' काय, मोदींची 'चाय पे चर्चा' काय हा सगळा प्रकार करण्याची वेळ राजकीय नेत्यांवर येते यातून दोन गोष्टी ठळकपणे स्पष्ट होतात एक म्हणजे मतदारांचा राजकीय पक्षांविषयी असलेला अविश्वास आणि राजकीय नेत्यांमध्ये नसलेला आत्मविश्वास या दोन गोष्टी या निवडणुकीमध्ये मतदारांशी आणि राजकीय नेत्यांची मानसिकता दर्शवणाऱ्या ठरतात. तब्बल पंधरा निवडणुका लढवून म्हणजेच सातत्याने साठ वर्षे मतदारांच्या संपर्कात राहूनही जर भारतातल्या प्रमुख राजकीय पक्षांना स्वत:च्या विजयाविषयी आत्मविश्वास वाटत नसेल किंवा मतदारांचा पूर्ण विश्वास संपादन करण्याबाबत त्यांना खात्री वाटत नसेल, तर त्यांच्या आतापर्यंतच्या राजकीय वाटचालीचे ते सर्वात मोठे दुर्दैव ठरते. खरे तर देशामध्ये एकतरी राजकीय पक्ष असा असायला हवा की लोकांना त्याच्याविषयी विश्वास वाटेल. प्रत्येक निवडणुकीमध्ये लोक त्याच्याकडे एक सक्षम पर्याय म्हणून पाहू शकतील किंवा अगदी दगडापेक्षा वीट मऊ या नात्याने या विचाराने निवडून देण्याची वेळ आली, तर एखादा तरी मोठा राजकीय पक्ष लोकांना जवळचा वाटायला हवा. परंतु आज ती देखील परिस्थिती नाही सगळे राजकीय पक्ष एकाच माळेचे मणी आहेत. कोणालाही वाणू नये आणि हिणू नये अशी त्यांच्याबाबत परिस्थिती आहे. लोकशाहीच्या भवितव्याचा विचार करताना हे काही चांगले लक्षण नाही. किंबहुना लोकशाहीच्या पुढील प्रवासाविषयी हे फार मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरते. म्हणूनच निवडणुका आल्या असल्या तरी विश्वास आणि आत्मविश्वासाची वानवा आहे, हे जाणवल्याशिवाय राहत नाही.

### लोकमताचा अनादर

एकीकडे जगातला सर्वात मोठा लोकशाहीवादी देश म्हणून आपण आपली पाठ थोपटून घेतो. जगातल्या अनेक देशांसाठीसुध्दा भारतातल्या निवडणुका हा आकर्षणाचा आणि अभ्यासाचा विषय असतो. अर्थात ही गोष्ट खरीच आहे की तब्बल सव्वाशे कोटींच्या या देशात ऐंशी कोटींपेक्षा जास्त मतदार स्वत:च्या पसंतीचे उमेदवार निवडतात आणि त्यातून लोकमताचा आदर करून सरकार अस्तित्वात येते. कोणत्याही देशातले सरकार तयार होत असताना त्यात प्रत्यक्ष लोकमताचा आदर होणे ही प्राथमिक गरज असते. भारतात त्यालाच प्राधान्य दिले जाते. परंतु हा लोकमताचा आदर आपल्याच राजकीय पक्षांच्या बेजबाबदारपणामुळे दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. त्याचा अनादर करुन केवळ सत्ता हस्तगत करण्याची कारस्थाने केली जातात आणि त्यासाठी निवडणूक पध्दतीचा गैरवापरही केला जातो. आज प्रत्येक उमेदवाराला निवडणूक खर्चासाठी सत्तर लाख रुपये अशी मर्यादा घालून देण्याची वेळ निवडणूक आयोगावर आली. यावरूनच या लोकमताचे मूल्य राजकीय पक्षांकडूनच दिवसेंदिवस कसे कमी केले जात आहे हे सिध्द होते. प्रत्यक्षात प्रत्येक उमेदवार लोकसभा निवडणुकीसाठी किमान दोन ते तीन कोटी रुपयांचा खर्च सहजपणे करतो. तशी तयारी त्याला ठेवावी लागते. गेल्या वर्षीच महाराष्ट्रातल्या भारतीय जनता पार्टीच्या एका वरिष्ठ नेत्याने आपल्याला जिंकून येण्यासाठी कसा आठ कोटी रुपये खर्च आला असे जाहीर विधान केले होते. पैशांचा भरमसाठ वापर म्हणजेच निवडणुका धनदांडग्यांना आंदण दिला गेल्यासारखीच स्थिती म्हणावी लागते. नुसत्याच धनशक्तीवर निवडणूक लढवता येत नाही त्यासोबत तशा प्रकारची दांडगाईसुध्दा करावी लागते. हा सगळा प्रकार करण्याची वेळ उमेदवारांवर येते. त्यातून त्यांच्याच मनामध्ये लोकशाहीविषयी यत्किंचितही आस्था उरली नसल्याचे स्पष्ट होते. कारण स्वत:च्या प्रतिमेतून किंवा प्रतिभेतून अथवा चांगले समाजकार्य केले म्हणून प्रतिष्ठेतून आपण निवडून येऊ याची त्यांना खात्री वाटत नसते. लोकशाहीची झूल पांघरून निवडून येणारे हे लोकप्रतिनिधी लोकशाहीचीच अप्रतिष्ठा करीत आहेत. त्यामुळेच आज लोकशाहीविषयी अनादर राजकीय नेत्यांमध्ये असलेला आत्मविश्वासाचा अभाव आणि लोकांमधला अविश्वास या गोष्टींचा निवडणुकांमध्ये विचार करणे क्रमप्राप्त झाले आहे.

### आजच्या राजकीय कौरवांची शोकांतिका

प्रत्यक्ष निवडणुकांच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असताना अजूनही देशातले दोन मोठे राजकीय पक्ष अन्य प्रादेशिक पक्षांबरोबर किंवा गटांबरोबर तडजोडी आणि समझोत्याचे प्रयत्न करत आहेत. बिहारमध्ये रामविलास पासवान यांच्यासारख्या कट्टर विरोधकालाही जवळ घेण्याची वेळ भाजपावर यावी. यावरून या पक्षाचा विजयाबाबतचा आत्मविश्वास डळमळीत असल्याचेच म्हणावे लागते. महाराष्ट्रातसुध्दा भारतीय जनता पार्टीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा आणि आम आदमी पार्टीचा जबरदस्त धाक वाटतो. म्हणूनच राज ठाकरे यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय महायुतीचा महातंबू टाकून त्यात स्वाभिमानी शेतकरी संघटना रिपब्लिकन पार्टी अशा अनेकांना घेऊन आपला तंबू शाबूत ठेवण्याचा प्रयत्न युती करत आहे. कॉंग्रेसला लालूप्रसाद यादव हेसुध्दा फार मोठा आधार वाटत आहेत. तर तामिळनाडूत वेळ पडली तर जयललितांनाही बरोबर घेण्याची तयारी कॉंग्रेस करीत आहे. दोन सर्वात मोठ्या राजकीय पक्षांनी हरवलेली स्वत:ची ताकद म्हणजेच त्यांच्या आतापर्यंतच्या कारकिर्दीची शोकांतिका म्हणावी लागेल. कुरुक्षेत्रावर रणदुंदुभी वाजत असताना आपल्या बाजूचे कोण आहेत हे जसे कौरव शोधत होते, तीच परिस्थिती आजच्या या राजकीय कौरवांची आहे.